

।नाशिक। ठक्कर्स समुहातर्फे मोफत रोपवाटप ठक्कर्स बझार येथे नुकतेच सुरू करण्यात आले. त्याप्रसंगी जितेंद्र ठक्कर व राजेंद्र ठक्कर यांच्यासमवेत सामाजिक वनीकरण सहाय्यक संचालक संजय लचके, प्रवीण पाटील, क्रेडाई नाशिकचे माजी अध्यक्ष किरण चव्हाण, सामाजिक वनीकरण उपसंचालक पी.एन. पाटील, एस.टी. विभाग नियंत्रक वाय.के.जोशी, क्रेडाई नाशिकचे अध्यक्ष जयेश ठक्कर, सुनिल गावंडे, अमित रोहमारे आदी.

# वृक्ष लागवड कार्यात ठक्कर्स समुहाची आघाडी

। नाशिक ।

ठक्कर्स उद्योग समुहातर्फे 'मिशन प्लॅन्टेशन' या योजनेअंतर्गत क्रेडाई व सामाजिक वनीकरण विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने संपूर्ण नाशिक शहरामध्ये वृक्ष लागवड, रोपांचे वाटप व संगोपन या संबंधी एक विशेष कार्यक्रम ठक्कर्स बझार येथे नुकताच झाला.

ठक्कर्स समुहातर्फे १५ ऑगस्टपर्यंत झाडांचे विना मोबदला वाटप ठक्कर्स बझार येथे तसेच त्र्यंबकरोडवर पीटीसीसमोर डोम येथे आणि इंडिगो पार्क, गोविंद नगर येथे होणार आहे. या कार्यक्रमात बोलताना ठक्कर्स समुहाचे अध्यक्ष जितेंद्र ठक्कर यांनी सांगितले की, ठक्कर्स उद्योग समूहाला ५० वर्षे पूर्ण झाल्याच्या निमित्ताने एक लाख झाडे लावण्याचा आम्ही दोन वर्षापूर्वी संकल्प केला होता. त्यापैकी ३५ हजार झाडांची लागवड आतापर्यंत पूर्ण झाली आहे. बाकी झाडांच्या लागवडीचे काम जोमाने पुढे चालविले जात आहे.या पैकी काही झाडे 'एक व्यक्ती एक झाड' या तत्वावर लावून त्यांचे संगोपन करणे सध्या सुरू आहे. जी व्यक्ती झाड लावेल त्या व्यक्तीने प्रत्येक महिन्यात त्याच्या वाढदिवसाच्या तारखेला त्या झाडाला सहकुटूंब भेट देऊन आपले त्या झाडाबरोबरचे स्नेहाचे नाते जोपासावे अशी ही संकल्पना आहे.

यावेळी बोलताना एसटी महामंडळातर्फे व्यापक वृक्षारोपण कार्यक्रम राबवून ग्रीन एस.टी. स्टॅण्ड निर्माण करावेत असे जितेंद्र ठक्कर यांनी सुचविले व त्या ठिकाणी लावल्या जाणाऱ्या झाडांची देखभाल खुद ठक्कर्स समुहातर्फे केली जाईल, असे जाहीर केले. त्यावर सदर कार्यक्रमात सन्माननीय अतिथी म्हणून उपस्थित असलेल्या एस.टी. विभाग नियंत्रक वाय.के.जोशी यांनी लगेचच दुजोरा दिला व महामंडळातर्फे ग्रीन एस.टी. विभाग नियंत्रक वाय.के. जोशी यांनी लगेचच दुजोरा दिला व महामंडळातर्फे ग्रीन एस.टी विभाग नियंत्रक वाय.के.जोशी यांनी लगेचच दुजोरा दिला व महामंडळातर्फे ग्रीन एस.टी. स्टॅण्डबरोबरच 'एक व्यक्ती एक झाड' हा उपक्रम सुध्दा राबविण्यात येईल असे सांगितले.

या प्रसंगी बोलताना सामाजिक वनीकरण उपसंचालक पी.एन. पाटील यांनी संपूर्ण महाराष्ट्रात सामाजिक वनीकरण विभागातर्फे राबविण्यात येत असलेल्या हरित महाराष्ट्र अभियान या योजनेची आणि त्याचबरोबर त्यांच्या विभागाच्या रोपवाटिकेत करण्यात आलेल्या रोप उपलब्धतेची माहिती दिली.

या कार्यक्रमाला क्रेडाई नाशिकचे अध्यक्ष जयेश ठक्कर,माजी अध्यक्ष किरण चव्हाण, सुनिल गावंडे, अमित रोहमारे तसेच सामाजिक वनीकरण विभागाचे सहाय्यक संचालक प्रवीण पाटील, संजय लचके तसेच माहिती व जनसंपर्क अधिकारी योगेश सातपुते आदी मान्यवर उपस्थित होते.